स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या आतंरविद्याशाखे अंतर्गत

जनसंवाद व पत्रकारिता विषयात पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा गोषवारा

::संशोधनाचा विषय ::

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ऐतिहासिक स्थळांनी साधलेला जनसंवाद

एक चिकित्सक अभ्यास

:: संशोधक ::

लोणेकर प्रितम तुकाराम

(एम.जे ॲण्ड एम.एस.सेट, एम.फिल.)

माध्यमशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

:: मार्गदर्शक ::

प्रा.डॉ.बालाजी एल. शिंदे

वृत्तपत्रविद्या विभाग प्रमुख,

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव ता.गंगाखेड जि.परभणी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

जुन 2019

ऐतिहासिक स्थळांनी साधलेला जनसंवाद:एक चिकित्सक अभ्यास

1. प्रस्तावना :

भारत हा एक प्राचिन, ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक, भौगोलिक, संस्कृती,विविध भाषा, वेशभुषा, अशा अनेक विविधतेने नटलेला आहे. या देशात त्यांच्या विकासात ऐतिहासिक स्थळांचे एक वेगळे महत्व आहे. देशाची संस्कृती, ही ऐतिहासिक स्थळांवरुन समजून येते. आजच्या आधुनिक युगात झपाट्याने होणारा विकास हा कुठे तरी, ऐतिहासिक स्थळाडे दुर्लेक्ष करित आहे. आपण आपले जिवनमान जगत असतांना आपली संस्कृती जोपासण्याचा प्रयत्न करीत असतो.

भारतातील एकता, संस्कृतीची जपवणुक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक विविधतेत एकता राहण्यासाठी ऐतिहासिक स्थळांची महत्वपुर्ण भूमिका आहे. मानव हा समाज जिवन जगताना एकमेकांच्या संस्कृती, अनुकरण करुन आतंर सांस्कृतिक संवाद साधत असतात. या संवादातून एकमेकांमध्ये प्रेम, आपुलकी, एकतेची भावना जागृत होत असते. यातूनच भारतातील एकता टिकून ठेवण्यास मदत होते. ऐतिहासिक स्थळे ही नुसती वास्तु नसून ते देशाचे एक प्रतिक म्हणून ओळखले जाते. तिची ओळख राहाण्यासाठी त्या स्थळांची जपवणुक करणे, त्यांचा विकास करुन पर्यटन विकासाला चालना देवून देशाच्या विकासात हातभार लावु शकतात.

2. संशोधन विषयाचे महत्व :

ऐतिहासिक स्थळे ही जनसंवादाच्या माध्यमातून आपल्यापर्यंत संवाद साधन असतात. प्रत्येक राज्यात होणाऱ्या यात्रा, उत्सव, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, अशा विविध कार्यक्रमातून सामजिक, एकता, आंतरसांस्कृतिक संवाद ? घडवून येवून सामाजिक एकता निर्माण होवून देशातील विकास प्रक्रियेत सहयोग करतात. महाराष्ट्रातील मराठवाडा प्रादेशिक विभाग हा विविध परंपरेने, संस्कृतीने ? एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. ऐतिहासिक स्थळांसाठी प्रसिद्धी असा औरंगाबाद, नांदेड, यांची नावे प्राध्यान्यानी घ्यावी लागतात.

मराठवाड्यात प्राचीन काळात सातवाहन,राष्ट्रकुट,चालुक्य, यादव, निजाम राजवट यांचे अधिराज्य होते. त्यात विविध ऐतिहासिक स्थळांची निर्मिती करुन सामाजिक ऐकता निर्माण करण्याची सुरुवात केली. प्रस्तुत विषयात विद्यापीठ परिक्षेत येणारे जिल्हे- हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर या जिल्हाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

3. संशोधन विषयाची उद्दिष्टे :

1) हिंगोली, नांदेड,लातूर, परभणी येथील ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास करणे.

2) ऐतिहासिक स्थळांनी साधलेल्या जनसंवादाचा अभ्यास करणे.

3) ऐतिहासिक स्थळामार्फत होणाऱ्या आतंरसांस्कृतिक संवादाचा अभ्यास करणे.

4) ऐतिहासिक स्थळामुळे होणाऱ्या सामाजिक बदल अन्य प्रभावाचा अभ्यास करणे.

5) ऐतिहासिक स्थळांचा विकासात शासन व जनतेची भूमिकाचा अभ्यास करणे.

4. संशोधन विषयाचे गृहितकृत्ये :

1) ऐतिहासिक स्थळे जनतेशी जनसंवाद साधतात.

2) ऐतिहासिक स्थळांच्या जतन व विकासात केंद्र व राज्य शासनाची भूमिकाचा साधारण आहे.

3) ऐतिहासिक स्थळे आंतरसास्कृतिक संवाद साधत असतात.

4) ऐतिहासिक स्थळातून संस्कृती व एकतेची जोपासना होते.

5) ऐतिहासिक स्थळे आतंरराष्ट्रीय स्तरावर जनसंवाद साधतात.

6) ऐतिहासिक स्थळाची माहिती प्रसार-प्रचार जास्त प्रमाणात नाही.

5. संशोधन पद्धती :

सदरील विषय ऐतिहासिक असल्याने ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. यातून ऐतिहासिक,वर्तमान, भविष्यकालीन घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

6. तथ्य संकलन :

प्रस्तुत विषयाचा प्राथमिक व दुय्यम तथ्य स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोत :

यात इतिहास कालीन अवशेष,जुनी स्मारके, ऐतिहासिक स्थळे, चित्रे, नाणी, कालवस्तु, तसेच प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखत, मिश्र प्रश्नावली मार्फत तथ्य संकलन केले जाणार आहे.

द्वितीय स्त्रोत :

द्वितीय स्त्रोची दोन भागात विभागणी केली जाते यात व्क्तीगत लेख, आत्मकथा, दैनंदिनी, पत्रे होत तर दुसरा स्त्रोत, सार्वजनिक प्रलेख,शासकीय कागदपत्रे, पुस्तके,वृत्तपत्रे,जिल्हाधिकारी कार्यालयातील दस्तावेज, जिल्हा माहिती कार्यालय, पुरातत्व विभाग, इतिहास तज्ञाचे लिखित लेख इत्यादीतून माहितीचे संकलन केले जाणार आहे.

7. संशोधनाची मर्यादा व्याप्ती:

प्रस्तुत संशोधन विषय स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ऐतिहासिक स्थळ
नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर या चार जिल्ह्याचा मर्यादीत करण्यात आला आहे. यात वरील जिल्हाच्या ऐतिहासिक स्थळांच्या अभ्यास करण्यात येईल.

8. प्रकरणीकरण :

संशोधनाच्या अभ्यास करण्यासाठी एकूण पाच प्रकरणात विभागणी केली आहे.

प्रकरण पहिले - जनसंवाद

प्रस्तुत विषयाच्या पहिल्या प्रकरणात संवाद म्हणजे काय ? संवादाचा अर्थ आणि व्याख्या, संवादाचे प्रकार, जनसंवाद,जनसंवादाची वैशिष्टे, जनसंवादाचे महत्व,जनसंवादाचे कार्य,जनसंवादाची जनमाध्यमे जनसंवादाची भूमिका यांची मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - संशोधन पद्धती :

या प्रकरणात संशोधनांचा अर्थ,व्याप्ती,महत्व, संशोधनाची गृहितकृत्ये, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन आराखडा, संशोधन पद्धती, संशोधन तथ्य संकलन आणि अभ्यास मर्यादा यांची मांडणी सदरील प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण तिसरे : नांदेड,परभणी,हिंगोली, लातूर जिल्हातील ऐतिहासिक पार्श्वभूमी

या प्रकरणात नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर जिल्हातील ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक, सामाजिक,ऐतिहासिक स्थळाचा इतिहास, ऐतिहासकि स्थळांची वैशिष्ट्ये ऐतिहासिक स्थळांची महत्व, ऐतिहासिक स्थळांची माहिती, यावर या प्रकरणात विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे

ऐतिहासिक स्थळ आणि जनसंवाद :

या प्रकरणात ऐतिहासिक स्थळांनी साधलेला जनतेशी संवाद, ऐतिहासिक स्थळा मार्फत घेणारे कार्य, केंद्रशासन, राज्य सरकार, स्थानिक जनतेची प्रसार माध्यम ,भूमिका यांचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरण - पाचवे :

निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनात साध्या झालेले निष्कर्ष, सुचना, शिफारशी, परिशिष्ट याचा समावेश करण्यात येणार आहे.

समोराप :

प्रस्तुत संशोधन विषयातून सामाजिक, ऐतिहासिक, आतंर सांस्कृतिक संवादावर संशोधन केले जाणार आहेत. ऐतिहासिक स्थळांमुळे होणारा सामाजिक,आर्थिक,राजकीय, बदल यांचा विशेष अभ्यास करण्यात येणार आहे. ऐतिहासिक स्थळांची जतन करणे ही काळाजी गरज झाली आहे. यातून होणाऱ्या विविध सांस्कृतिक, संवर्धनाची, रोजगाराची गरज पाहता यावर अभ्यास होणे गरजेचे असल्याने सदरील विषय संशोधनासाठी मांडण्यात आला आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :

1) गोळवलकर पोटदुखे रमा : जनसंवाद सिद्धात आणि व्यवहार श्री मंशे प्रकाशन नागपूर 2005.

2) पवार सुधाकर : संवादशास्त्र, मानसन्मान प्रकाशन पुणे.

3) दातार सुषमा : संदार विश्व, मंगेश प्रकाशन पुणे.

4) डॉ.पांडे : जनसंचार द्रश्य परिद्रश्य, उमेश प्रकाशन, इलाहाबाद.

5) डॉ.श्रीपाद जोशी : जनसंवाद आणि जनमाध्यम,मंगेश प्रकाशन नागपूर 2002.

6) काचोळे दा.धो.: सामाजिक संशोधन पद्धती, कैलास प्रकाशन औरंगाबाद 2005.

7) डॉ.अरविंद चौधरी : डॉ. दिनेश भक्करक - संशोधन पद्धती वणिज्य व व्यवस्थापन प्रशांत प्रकाशन जळगाव 2013

8) पु.ल. भांडरकर : सामाजिक संशोधन पद्धती, श्री मंगेश प्रकाशन नागपूर 2003.

9) संतोष दस्ताने असा हा महाराष्ट्र 2009.

10) कला शाखा घटक : K सागर प्रकाशन 2002.

संशोधक **मार्गदर्शक**